# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः27.10.2024** **वारःरविवार**

---

- विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्षांकडून उमेदवारांच्या नावांची घोषणा
- आकाशवाणीच्या मन की बात मधून पंतप्रधान आज साधणार जनतेशी संवाद
- भारतानं स्थैर्याच्या जोरावर जगाचा विश्वास संपादन केला असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांचं प्रतिपादन
- पुणे क्रिकेट कसोटीमध्ये न्यूझीलंडचा भारतावर 113 धावांनी विजय; मालिकेत विजयी आघाडी

**<u>निवडणूक</u>**

विधानसभा निवडणुकीसाठी विविध पक्ष आपापल्या उमेदवारांच्या नावांची घोषणा करत आहेत. भारतीय जनता पक्षानं काल २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. त्यात नाशिक मध्य मतदारसंघातून देवयानी फरांदे, गडचिरोली विधानसभा क्षेत्रातून डॉक्टर मिलिंद नरोटे तर वाशिममध्ये श्याम खोडे यांना उमेदवारी मिळाली आहे. पुण्यातील कसब्यात हेमंत रासने तर पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातून सुनील कांबळे आणि खडकवासल्यात भीमराव तापकीर यांना उमेदवारी मिळाली आहे.

कॉंग्रेसनं काल दोन याद्या जाहीर केल्या. पहिल्या यादीत भुसावळमधून राजेश मानवतकर, नागपूर दक्षिणमधून गिरिश पांडव, राळेगावमधून वसंत पुरके, जालनामधून कैलास गोरंट्याल, औरंगाबाद पूर्वमधून मधुकर देशमुख, वसईमधून विजय पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

पुढच्या यादीत कॉंग्रेसतर्फे गडचिरोलीमध्ये मनोहर पोरेटी, दिग्रसमध्ये माणिकराव ठाकरे, नांदेड दक्षिणमध्ये मोहनराव अंबाडे, तर वांद्रे पश्चिममध्ये आसिफ झकेरिया यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानंही काल २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली. यात माळशिरसमधून उत्तम जानकर, फलटण इथून दीपक चव्हाण, खडकवासला इथून सचिन दोडके, अकोले इथून अमित भांगरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. बीड इथून संदीप क्षीरसागर, गंगापूरमधून सतीश चव्हाण, येवला इथून माणिकराव शिंदे यांना रिंगणात उतरवण्यात आलं आहे. पुण्यातील पर्वती मधून अश्विनी कदम तर खडकवासल्यातून सचिन दोडके यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आलं आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे १८ उमेदवारांची घोषणा काल झाली. धुळ्यातून अनिल गोटे, हिंगोलीतून रूपाली पाटील, शिवडीतून अजय चौधरी तर भायखळ्यातून मनोज जामसुतकर रिंगणात आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही १५ उमेदवारांची पुढची यादी काल जाहीर केली यात पनवेलमधून योगश चिले. अक्कलकोटमधून मल्लिनाथ पाटील, तर सोलापूर शहर मध्यनागेश पासकंटी यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि काँग्रेसमध्ये काही जागांची अदलाबदल करण्यासंदर्भात चर्चा झाल्याची माहिती काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी काल दिली. १८० पेक्षा अधिक जागा जिंकण्याचं महाविकास आघाडीचं लक्ष्य असल्याचं ते यावेळी म्हणाले.

मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहिम मतदारसंघात निवडणुकीत मदत करायला हवी, असं भाजपचे मुंबई प्रदेशाध्यक्ष आशीष शेलार यांनी म्हटलं आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याशी चर्चा करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवार देण्याऐवजी महाराष्ट्र स्वराज्य पक्षातून उमेदवार उभे करावेत असा प्रस्ताव महाराष्ट्र स्वराज्य पक्षप्रमुख संभाजी राजे छत्रपती यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्याकडे मांडला.

संभाजी राजे छत्रपती यांनी काल जालना जिल्ह्यातल्या अंतरवली सराटी इथं जरांगे यांची भेट घेऊन निवडणूक लढण्यासंदर्भात सविस्तर चर्चा केली.

निवडणुकीत महिलांची मतं मिळावीत म्हणून लाडकी बहीणसारख्या योजना सरकारनं जाहीर केल्या आहेत, असं मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी काल मुंबईत वार्ताहर परिषदेत व्यक्त केलं. या सरकारनं नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अजूनही भरपाई दिलेली नाही, असा आरोप त्यांनी केला.

अहिल्यानगर जिल्ह्यात झालेल्या एका सभेत काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांच्या कन्येविषयी भाजपाच्या एका नेत्यानं प्रचार सभेत अपशब्द काढले होते. या प्रकाराचा भाजपानं निषेध केला आहे. हे प्रकार खपवून घेणार नसल्याचं प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे.   दरम्यान या प्रकारानंतर अज्ञातांकडून सुजय विखे यांच्या समर्थकांच्या गाड्यांची तोडफोड आणि जाळपोळ करण्यात आली. या घटनेमुळे परिसरात तणाव निर्माण झाला होता.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी तयार करण्यात आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाररथाला पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी काल हिरवा झेंडा दाखवला. या विशेष एलईडी व्हॅनच्या माध्यमातून महायुतीच्या काळात राबवलेल्या विविध योजना मतदारांना दाखवण्यात येणार आहेत.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

**<u>मन की बात-संध्या</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आकाशवाणीच्या मन की बात या कार्यक्रमाद्वारे सकाळी अकरा वाजता देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा 115 वा भाग आहे. हा कार्यक्रम आकाशवाणीच्या सर्व केंद्रांवरून आणि दूरदर्शन वाहिनीवरून प्रसारित होईल. Newsonair डॉट gov डॉट in हे संकेतस्थळ तसंच न्यूज ऑन एअर या मोबाईल ॲपवरही हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल. आकाशवाणी आणि दूरदर्शनचे यूट्यूब चॅनल, प्रधानमंत्री

कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या यूट्यूब चॅनलवर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण केलं जाणार आहे. या प्रसारणानंतर लगेचच प्रादेशिक भाषांमध्ये हा कार्यक्रम प्रसारित केला जाईल.

**जयशंकर**

भारतात गेल्या अकरा वर्षांपासून स्थिर सरकार असल्यामुळे पायाभूत सुविधांचा विस्तार मोठ्या प्रमाणात झाला आहे; याच स्थैर्याच्या जोरावर भारताने जगाचा विश्वास संपादन केला आहे, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी काल पुण्यात केलं.

"जागतिक स्तरावरील उदयोन्मुख संधी" या विषयावर यशस्वी संस्थेनं आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह पुण्याच्या उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसंच अनेक युवक युवती या कार्यक्रमाला उपस्थित होते.

रेल्वे मार्ग आणि मेट्रो यासारख्या पायाभूत सुविधांमुळे परकीय गुंतवणूकदार भारताकडे आकर्षित होत आहेत; त्याचबरोबर चंद्रयान मोहीम, कोविड काळात विविध देशांना केलेला लस पुरवठा या धोरणांमुळे जगात आपली प्रतिमा उंचावली, आहे, असं डॉक्टर जयशंकर म्हणाले.

**दिवाळी-पाठक-संध्या**

दिवाळीच्या मंगलमय पर्वाला उद्यापासून सुरवात होत आहे. दिवाळीच्या निमित्तानं बाजारपेठेत चैतन्याचं वातावरण असून नागरिक विविध वस्तूंच्या खरेदीचा आनंद घेताना दिसत आहेत. आकाशकंदिल,पणत्या,आकर्षक रोषणाईचे दिवे, माळा, किल्ल्यावरची चित्रे आणि धार्मिक पूजासाहित्यांनी बाजारपेठ सजली आहे.सराफी पेढ्यांवरही गर्दी बघायला मिळत आहे.

**जाहिराती**

विधानसभा निवडणूक प्रचारासाठी राजकीय जाहिरातींचा प्रत्यक्ष वापर किंवा प्रसारण करण्यापूर्वी या जाहिरातींसाठी राज्यस्तरीय माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समितीची परवानगी घेणं आवश्यक आहे, असं निवडणूक आयोगानं कळवलं आहे. यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण आणि सनियंत्रण समिती

नेमण्यात आल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं म्हटलं आहे. मुद्रित माध्यमांमध्ये मतदानाच्या आधीच्या तसंच मतदानाच्या दिवशी प्रकाशित केल्या जाणाऱ्या राजकीय जाहिरातींसाठीही राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती यांनी पूर्वपरवानगी घेणं आवश्यक आहे.

**<u>मतदान केंद्र</u>**

राज्यात येत्या विधानसभा निवडणुकीसाठी दुर्गम भागातल्या आणि योग्य संपर्क यंत्रणा नसलेल्या नागरिकांना मतदान करता यावं यासाठी ९१५ मतदान केंद्रं उभारण्यात येणार असल्याची माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. अशा प्रकारची सर्वाधिक २३२ शॅडो मतदान केंद्रं रत्नागिरी जिल्ह्यात तर सांगलीत केवळ एकच शॅडो मतदान केंद्र असेल. ही शॅडो मतदान केंद्रं २४ जिल्ह्यांमध्ये असून यामध्ये मतदानाच्या दिवशी विशेष सुविधा असतील. त्यात विशेष मेसेंजर, वॉकी-टॉकी, व्हीएचएफ हे उच्च क्षमतेचे फोन, वायरलेस सेंटर, वायरलेस कम्युनिकेशन सेवा, सॅटेलाईट फोन, वन आणि पोलीस विभागाचा रनर यांचा समावेश आहे. या बरोबरच बीएसएनएलमार्फत पर्यायी कम्युनिकेशन यंत्रणाही कार्यरत असेल.

**<u>स्विप-कांबळे-संध्या</u>**

मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील जिल्हा परिषद विद्यालय कामरगाव इथल्या विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांच्या मार्गदर्शनात मानवी साखळी तयार केली. महाबळेश्वरमध्ये विदयार्थी , शिक्षक आणि ग्रामस्थ यांनी प्रभात फेरी काढून मतदानाचं महत्त्व पटवून दिलं.

**<u>लासलगाव-बंद</u>**

कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असलेली लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समिती दिवाळी निमित्त उद्यापासून शनिवारी 2 नोव्हेंबर पर्यंत सलग सहा दिवस बंद राहणार आहे. या सहा दिवसात व्यापारी कांदा खरेदी करणार असल्याने बाजार समिती बंद राहणार असल्याचे बाजार समितीच्या प्रशासनानं कळवलं आहे.

**<u>हेमलकसा</u>**

गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा इथल्या डॉक्टर प्रकाश आमटे यांच्या लोकबिरादरी आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांनी नागपूर विभागीय शालेय मल्लखांब आणि रोप मल्लखांब स्पर्धेत विजेतेपद पटकावलं आहे. शिवाय खो-खो स्पर्धेतही लोकबिरादरीचा चमू विजेता ठरला असून, त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे. खो-खो ची १७ वर्षे वयोगटातील मुलींची विभागीय स्पर्धा गडचिरोलीमध्ये झाली. या स्पर्धेतही लोकबिरादरीच्या विद्यार्थिनींनी विजेतेपद पटकावल्याने त्यांची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड झाली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान पुण्यात खेळल्या गेलेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडनं भारतावर 113 धावांनी मात करत तीन सामन्यांच्या  मालिकेत 2– 0 अशी विजयी आघाडी घेतली.  दुसऱ्या कसोटी सामन्यातही भारतीय फलंदाजांची कामगिरी निराशाजनक झाली. न्यूझीलंडनं दिलेल्या 359 धावांच्या आव्हानाला सामोरं जाताना,  भारतीय संघ 245 धावाच करू शकला.

**<u>हवामान-आयएमडी-सुरेखा</u>**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.